divyamarathi.com

# ‘दानापूर- पुणे’ला चाळीसगाव, पाचोरा येथे थांबा द्या

**चाळीसगाव** | जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील भारतीय जवानांना सुटीवर घरी येण्यासाठी दानापूर-पुणे ही रेल्वे गाडी सोयीस्कर असून या गाडीला चाळीसगाव येथे थांबा द्यावा अशा मागणीचे निवेदन रयत सेनेने रेल्वे स्टेशन प्रबंधक सणस यांना दिले.

जळगाव, धुळे व नंदुरबार आणि खान्देशातील सेवा बजावत असलेल्या जवानांचे पटना येथे मुख्यालय आहे. खान्देशातील अनेक सुपुत्र हे भारतीय सैन्यदलात देश सेवेसाठी कार्यरत आहेत. हे जवान सुट्टी मिळाल्यानंतर रेल्वेने दानापुर स्थानकावरून दानापूर पुणे एक्सप्रेसने प्रवास करून भुसावळ येथे उतरतात. तेथुन जळगाव पाचोरा, धुळे व चाळीसगाव येथे येऊन ग्रामीण भाग व शहरी भागात आपापल्या घरी पोहचतात. जवानांना सोयीस्कर प्रवास करता येवुन वेळ आणि पैसा वाचण्यासाठी रेल्वे प्रशासनाने दानापुर पुणे एक्सप्रेसला चाळीसगाव, पाचोरा, जळगाव रेल्वे रेल्वे स्थानकावर थांबा द्यावा अशी मागणी रयत सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.